संकेतस्थळावर प्रसिध्दी साठी

नाशिक महानगरपालिका, नाशिक

निवडणूक विभाग

कोटेशन नोटीस 2021-22

नाशिक महानगरपालिकेच्या निवडणूक विभागकरीता खालील नमूद केलेल्या सेवा पुरविणे कामी बाह्य अभिकरणामार्फत दर मंजूर करुन त्यादराने काम करणेस अनुभवी सेवा पुरविणा-या व व्यावसायिक यांचेकडुन कोटेशन मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | तपशिल | र. रु. |
|---|---|---|---|
| 1. | ए4 साईज, 70 जीएसएम, मॅपलिथो पेपर | प्रभागनिहाय मतदार यादी छपाई व फॉर्म एक बाजू | |
| | | प्रभागनिहाय मतदार यादी छपाई व फॉर्म एक बाजू | |
| 2. | लिगल साईज, 70 जीएसएम, मॅपलिथो पेपर | प्रभागनिहाय मतदार यादी छपाई व फॉर्म एक बाजू | |
| | | प्रभागनिहाय मतदार यादी छपाई व फॉर्म एक बाजू | |
| 3. | ए 3 साईज, 70 जीएसएम, मॅपलिथो पेपर | प्रभागनिहाय मतदार यादी छपाई व फॉर्म एक बाजू | |
| | | प्रभागनिहाय मतदार यादी छपाई व फॉर्म एक बाजू | |

**अटी/शर्ती**

1) वरील कामाचे कोटेशन पत्रक (अटीशर्ती सह www.nashikcorporation.in) या संकेतस्थळावर दिनांक 24/03/ 2022 रोजी दुपारी 12.00 वाजे पावेतो उपलब्ध आहे.
2) कोटेशन पाकिट सादरीकरणाची अंतिम मुदत दिनांक 24/03/2022 रोजी दुपारी 1.00 वाजेपर्यंत राहील. मुदतीनंतर प्राप्त झालेले कोटेशन पाकिट स्विकारले जाणार नाही. कोटेशन पाकिटे निवडणूक विभाग, राजीव गांधी भवन शरणपुररोड येथे स्विकारण्यात येतील.
3) सदरची सेवा नाशिक महानगरपालिका मुख्यालय किंवा आदेशात नमुद केलेल्या ठिकाणी पुरवावी लागेल. त्यासाठी वेगळा वाहतुक खर्च देण्यात येणार नाही.
4) कार्यादेश मिळाल्यापासून दुस-या दिवसापासून आठ दिवसाचे आत काम पूर्ण करणे बंधनकारक राहील.
5) सदरचे दरपत्रकात सर्व करासह नमुद करावयाछे आहेत. कोणत्याही कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही. कोटेशन सोबत पॅन कार्ड, वैध शॉप ॲक्ट दाखला किंवा नोंदणीकृत संस्थेचा दाखला जसे जी.एस.टी. नोंदणी बाबतचे कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय कोटेशनचा विचार केला जाणार नाही.
6) कोणतेही कोटेश स्विकारणे अगर नाकरण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील.
7) सदरचे दरपत्रकात सर्व करासह व अनुषंगीक खर्चासह दर नमुद करावयाचे आहेत. कोणत्याही कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही.

दिनांक : 15/03/2022

सही XXX

(मनोज घोडेपाटील)

उपआयुक्त (प्रशासन),

नाशिक महानगरपालिका, नाशिक

नाशिक महानगरपालिका, नाशिक

निवडणूक विभाग

सर्वसाधारण अटी/शर्ती (कोटेशन)

05/2022

1) कोटेशन सोबतची कोटेशनधारकाची कोणतीही अट मान्य करता येणार नाही. सशर्त कोटेशन तात्काळ रद्द करण्यात येईल.
2) कार्यादेश मिळाल्यापासून दुस-या दिवसापासून आठ दिवसाचे आत काम पूर्ण करणे बंधनकारक राहील.
3) कोटेशन नोटिस मध्ये नमुद केलेली कामे ही अंदाजे असुन त्यामध्ये कमी जास्त होण्याची शक्यता आहे.
4) दिलेल्या मुदतीमध्ये संपुर्ण काम करणे/ सेवा पुरविणे आवश्यक आहे काही अपरिहार्य कारणास्तव निवडणूकीचे कामकाज पुढे ढकल्यास किंवा कामकाज पुर्ण होईपावेतो निम्न स्वाक्षरीकार यांचे आदेशान्वये कामकाज करणे बंधनकारक राहिल. तथापी मुदतवाढ द्यावयाची किंवा कशी या बाबत महापालिकेचा निर्णय अंतिम राहील.
5) ज्यांची संपुर्ण किंवा भागश: कोटेशन दर मंजुर होईल त्या कोटेशनधारकास महानगरपालिकेचे लाभात र.रु.520/- चे जनरल स्टॅप पेपर वर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल. तसेच एक सक्षम जामीनदार द्यावा लागेल.
6) जी.एस.टी करासह कोटेशन दर नमुद करावयाचे आहे.कोणत्याही टॅक्सची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही.
7) मुदतीत काम न केल्यास / सेवा न पुरविल्यास / केलेल्या कामावर / मंजुर दाराच्या रकमेवर दर हजारी दर दिवसाला र. रु. 1/- याप्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल व सदरची रक्कम कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल.
8) सदरचे मंजुर दराने कराराचे मुदतीपर्यंत वेळोवेळी गरजेनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील.
9) मुदतीत काम पुर्ण न केल्यास कोटेशनधारकाचे जबाबदारीवर इतर ठिकाणाहुन सदरचे कामकाज करुन घेण्यात येईल आणि त्या कामी महानगरपालिकेस मंजुर दरापेक्षा जास्त खर्च आल्यास तो कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल.
10) मंजुरीप्रमाणे कामकाज न झाल्यास अथवा सेवा नाकारण्यात येईल व त्याबाबतचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील.
11) मंजुर केलेले कामकाज हे याच दराने कोटेशनधारकाकडुन करुन घेण्याची महानगरपालिकेवर सक्ती नाही. याबाबत कोटेशनधारकास नुकसानभरपाई मागता येणार नाही.
12) अभिकरणास दिलेले कामकाज पुर्ण झाल्यानंतर म्हणजेच प्रभाग रचना अंतिम झाल्यानंतर सर्व टप्याचे एकाच वेळी वेगवेगळे देयके अदा केले जातील. कोणत्याही टप्यावर भागश: किंवा झालेल्या कामकाजाचे देयक अदा केले जाणार नाही. तसेच कोणत्याही प्रकारची उचल किंवा अगाऊ रक्कम अदा केली जाणार नाही.
13) अटी / शर्तीमधील एखाद्या शर्तीबाबत काही सवलत देणे अथवा आवश्यक अशा काही जादा अटी घालण्याबाबत महानगरपालिकेस अधिकार राहील.
14) कोटेशन दर मंजुर झालेनंतर सदरच्या कामाच्या दरात/सेवेच्या/दरात काही वाढ झाल्यास वाढलेल्या दराप्रमाणे कोटेशनधारकास जादा पैसे मिळणार नाही.
15) सेवा पुरविण्या-या अभिकरणाने अटिशर्तीचा भंग केल्यास त्यांचे बिलातुन रक्कम जप्त करण्यात येईल.
16) काही अपरिहार्य कारणास्तव देयके अदा करणेस उशिर झाल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.
17) सदरची सेवा पुरविण्याबाबतीतचे दर उपलब्ध असलेस आणि गुणवते बाबत साम्य असलेस अशा बाबत इतर अभिकरणाकडील दराशी तुलना करणेत येईल. इतर अभिकरणाच्या दरापेक्षा कोटेशन दर कमी असलेस असे दर मंजुर करणे बाबत विचार करणेत येईल अन्यथा इतर अभिकरणामार्फत कामकाज करुन घेणे बाबतचा अधिकार राखुन ठेवण्यात येत आहे.

दिनांक : 15/03/2022

सही XXX

(मनोज घोडेपाटील)

उपआयुक्त (प्रशासन)

नाशिक महानगरपालिका, नाशिक

सदरचे अटी/शर्ती मी वाचल्या असुन सदरच्या अटी/शर्ती मान्य व कबुल असुन त्याप्रमाणे माल/सेवा पुरविण्यास/काम करण्यास मी तयार आहे. त्यासाठी स्वाक्षरी करत आहे.

निविदाधारकाची सही व शिक्का

नाशिक महानगरपालिका, नाशिक

निवडणूक विभाग

कोटेशन नोटीस 2021-22

**कामाचे नांव** **:** सार्वत्रिक निवडणूक 2022 च्या अनुषंगाने प्रभागनिहाय मतदार यादी व फॉर्मस छपाई (Printing) करणे.

**कामाची मुदत** **:** कार्यादेश मिळाल्यापासून दुस-या दिवसापासून सोडतीचे दिनांकापावेतो पुरविणे बंधनकारक राहील.

**कोटेशन सादर करण्याची अंतिम मुदत :** दिनांक 24/03/2022 रोजी दुपारी 1.00 वाजेपर्यत.

**कोटेशनधारकाचे नाव व पत्ता : ...........................................................................................................**

**...........................................................................................................**

**...........................................................................................................**

**संपर्क क्रमांक** **: ..........................................**

उक्त प्रमाणे कामाचे अटी/शर्ती नुसार सेवा पुरविणेकामी मी/आम्ही पुढीलप्रमाणे सर्व करांसह दर सादर करीत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | तपशिल | अंदाजे प्राकलन र. रु. |
|---|---|---|---|
| 1. | ए4 साईज, 70 जीएसएम, मॅपलिथो पेपर | प्रभागनिहाय मतदार यादी छपाई व फॉर्म एक बाजू | |
| | | प्रभागनिहाय मतदार यादी छपाई व फॉर्म एक बाजू | |
| 2. | लिगल साईज, 70 जीएसएम, मॅपलिथो पेपर | प्रभागनिहाय मतदार यादी छपाई व फॉर्म एक बाजू | |
| | | प्रभागनिहाय मतदार यादी छपाई व फॉर्म एक बाजू | |
| 3. | ए 3 साईज, 70 जीएसएम, मॅपलिथो पेपर | प्रभागनिहाय मतदार यादी छपाई व फॉर्म एक बाजू | |
| | | प्रभागनिहाय मतदार यादी छपाई व फॉर्म एक बाजू | |

सदर कोटेशनसोबत असलेल्या सर्व अटी/शर्ती मी वाचले असुन मला त्या मान्य आहेत. सदर अटी शर्ती प्रमाणे सदर कोटेशनमध्ये नमुद केलेल्य दराने कार्यादेश मिळाल्यापासून दुस-या दिवसापासून ते तीन दिवसांच्या आत कालावधीत सेवा पुरविण्यास मी तयार आहे. त्यासाठी या कोटेशनवर स्वाक्षरी करीत आहे.

दिनांक :

ठिकाणी :

निविदाधारकाची सही व शिक्का